# गोरेगाव पत्राचाळ प्रकल्पातील ९० टक्के सदनिकांमध्ये दोष?




## म्हाडाकडून दुरुस्तीचे आश्वासन, मात्र कार्यवाही नाही

■ प्रतिनिधी, मुंबई

गोरेगाव पश्चिम येथील बहुचर्चित पत्राचाळ प्रकल्पात मोठा गाजावाजा करीत म्हाडाने ६७२ रहिवाशांना घरांचा ताबा देण्यासाठी सोडत काढली. परंतु ९० टक्के सदनिकांमध्ये दोष असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल, असे आश्वासन म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जायस्वाल यांनी दिले आहे. विकास तसेच वैयक्तिक करारनामाही म्हाडाने अद्याप दिलेला नाही, असे या रहिवाशांनी सांगितले. या इमारतींच्या संरचनात्मक स्थिरतेबाबत खात्री मिळत नाही, तोपर्यंत ताबा घेता येणार नाही अशी भूमिका रहिवाशांनी घेतली आहे.

रहिवाशांनी नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने ९० टक्के सदनिकांमध्ये दोष असल्याचा अहवाल दिला असून त्याकडे म्हाडा दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. सोडतीच्या आदल्या दिवशी या इमारतीच्या एका विंगचा मोठा भाग कोसळला. ही बाब उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणता त्या विंगेचे संरचनात्मक परिक्षण व्हीजेटीआयमार्फत करण्याचे आदेश दिले आहेत. हा अहवाल मिळाल्याचे म्हाडाने सांगितले असले तरी अहवाल अद्याप उघड केलेला नाही.

याबाबत न्यायालयात सुनावणीची तारिख निश्चित होत नसल्यामुळे नेमका अहवाल अद्याप गुलदस्त्यात आहे. हा अहवाल फक्त एका विंगेपुरता आहे. अशा १६ विंग या प्रकल्पात आहे. या सर्व इमारतींच्या संरचनात्मक स्थैर्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे इतके दोष असताना म्हाडाने संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र जारी कसे केले, असा सवाल रहिवाशी विचारत आहेत. गोरेगाव विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश मदामे यांनी मात्र हे आरोप फेटाळून लावले आहेत. इमारती पूर्ण झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ समितीच्या अहवालानुसार पत्राचाळ प्रकल्पात म्हाडाने प्रकल्प व्यवस्थापन समिती (पीएमसी) न नेमल्यामुळे चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) घोटाळा झाला असे नमूद केले होते. मात्र नंतरचे अपूर्ण काम पूर्ण करताना त्यावर देखरेख ठेवण्यासाठीही म्हाडाने पीएमसीची नियुक्ती केली नाही आणि संस्थेने नेमलेल्या पीएमसीलाही संपूर्ण संरचनात्मक तपासणी (स्ट्रक्चरल ऑडिट) करू न देता फक्त सदनिकेचे अंतर्गत ऑडिट करण्यास दिले. संस्थेच्या पीएमसीने जो अहवाल दिला, त्यात जवळपास ७० टक्के घरातील भिंतीना भेगा, निकृष्ट दर्जाचे दरवाजे/खिडक्या, गळती या त्रुटी आहेत असे स्पष्टपणे लिहिले आहे. ६७२ पैकी ९० टक्के सदनिकांमध्ये दोष असल्याचा अहवाल पीएमसीने दिल्याचे पत्रा चाळ संघर्ष समितीचे परेश चव्हाण यांनी सांगितले.

म्हाडाने २०१८ मध्ये आधीच्या विकासकाला निष्कासीत केले आणि फेब्रुवारी २०२२ पासून पुनर्वसन क्षेत्राच्या बांधकामास सुरुवात केली. तेव्हा संस्थेसोबत विकास करारनामा करणे म्हाडाला अनिवार्य होते.

# चौदा वर्षांत पुनर्विकासाची वीटही रचली नाही, रहिवासी न्यायालयात

■ प्रतिनिधी, मुंबई

वरळीच्या बीडीडी चाळीतील रहिवासी ५०० फुटांच्या घरात दिवाळी साजरी करण्याचे नियोजन करीत असताना गिरगावातील जगन्नाथ चाळ झाऊबा वाडीतील रहिवाशांना मात्र रखडलेल्या पुनर्वसनाचा लढा लढण्यासाठी न्यायालयाची पायरी चाढवी लागली आहे. १४ वर्षांपासून पुनर्विकास रखडल्याने विकासक आणि म्हाडाच्या कारभारविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत जनहित याचिका दाखल केली आहे.

९१ अ कायद्याअंतर्गत २५ चाळी व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाची मागणी रहिवाशांनी केली आहे. येथील पाचशेहून अधिक कुटुंब पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत. विकासकाने हा प्रकल्प हाती घेतेला, मात्र आजपर्यंत या साइटवर कोणतेही काम झाले नसल्याचे जगन्नाथ चाळीचे रहिवासी व याचिकाकर्ते श्रेयस आचरेकर यांनी सांगितले. गेल्या तीन वर्षांत अनेक वेळा रहिवाशांनी तक्रारी केल्या. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित झालेल्या बैठकांमध्ये म्हाडाला स्पष्टपणे सूचना देत विकास काविरोधात कारवाई करावी असे आदेश दिले होते. रहिवाशांनी वकिलांमार्फत १० पत्रे म्हाडा व संबंधित अधिकाऱ्यांना पाठवली आहेत. मात्र त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप स्थानिक रहिवासी रेखा दांडेकर यांनी केला आहे.

अनेक ज्येष्ठ नागरिक पुनर्विकासाची वाट पाहत जग सोडून गेले आहेत. चाळी आता रहिवाशांसाठी धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे सर्व प्रशासकीय मार्ग संपल्याने रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही याचिका शंभरहून अधिक भाडेकरूंचे प्रतिनिधित्व करत श्रेयस आचरेकर, दीपक वैद्य,अनिमेष कर्माकर, प्रमोद देवधर आणि रेखा दांडेकर यांनी दाखल केली आहे.

# बोरिवलीमध्ये एका दिवसात ५ हजार फुकटे प्रवासी; १३.५ लाखांचा रुपयांचा दंड वसूल

■ प्रतिनिधी, मुंबई

पश्चिम रेल्वेने नमस्ते नावाचे अभियान सुरू केले असून या माध्यमातून ३०० टीसींची फौज तयार केली आहे. बोरिवली स्टेशनमधून या मोहिमेची बुधवारी सुरुवात झाली असून, या स्टेशनवर एका दिवसात ५ हजार १९२ विनातिकीट प्रवासी पकडले. त्यांच्याकडून १३.५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.


## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि.केंद्र परळी-वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम/ बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र. ३००००६०७१७ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ २७.५ व्हीआयएमटी २००० एयर प्रीहीटर स्पेयर्स रीक्वायर्ड फॉर एओएच अँट बीएम-२, यू-८, २५० मे. वॅट अँट, टीपीएस परळी वै. | ६.६५ लाख १०१५०/- | ०९.०८.२०२५ ते १४.०८.२०२५ | १५.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०७८३ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ रोटरी सिस्टिम (आरजीबी) फॉर बीबीडी ४७७२ कोल मिल अँट बीएम-१, २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ५४.८० लाख ५८३००/- | ०९.०८.२०२५ ते १६.०८.२०२५ | १७.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०७८८ (आर) | वर्क ऑफ रिकंडिशनिंग ऑफ झेडआर-२७५ एयर कॉम्प्रेसर एचपी स्क्रू एलिमेंट अँड सप्लाय ऑफ स्पेयर पार्ट्स मटेरियल ड्यूरिंग सीओएच अँट एएचपी, यू-८, टीपीएस, परळी वै. | ६.२३ लाख ९७३०/- | ०९.०८.२०२५ ते १६.०८.२०२५ | १७.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०६२४ (आर) | वर्क ऑफ रीपेरिंग पीडब्ल्यूडी-१८ गियरबॉक्स ऑफ स्टॅकर रिक्लेमर ट्रव्हेल्लिंग इंस्टॉलड अँट सीएचपी-१, २५० मे. वॅट अँट, टीपीएस परळी वै. | १८.२० लाख २१७००/- | ०९.०८.२०२५ ते २४.०८.२०२५ | २५.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००० ५९९५७ | वर्क ऑफ फ्लूइडाझिंग एयर ब्लोवर अँड लोबीज रिकंडिशनिंग अँट एएचपी यू-८, टीपीएस, परळी वै. | ६.०० लाख ९५००/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०१३० | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर अनलोडिंग द कोल वेगन्स मॅन्युयली, ट्रान्सपोर्टेशन ऑफ मॅन्युयली अनलोडेड कोल अँड अदर रिलेटेड वर्क्स अँट सीएचपी-२, २५० मे. वॅट अँट, टीपीएस परळी वै. | ६५.६४ लाख ६९१४९/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०१४० | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग अँन एक्सटर्नल स्टेयरकेस टु द क्रशर हाऊस फॉर सेफ एक्झिट इन एर्मजन्सि कंडिशन अँट सीएचपी-१, २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.११ लाख ८६२०/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०१७५ | रीपेरिंग अँड ओवरहौलिंग ऑफ केसीएन -३५५ गियरबॉक्स इंस्टॉलड फॉर बीसी-१ अँड बीसी-५ कन्वेयर्स अँट सीएचपी-१, २५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | १४.०५ लाख १७५५०/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०३१४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ लोड सेल अँड समेशन जेबीज फॉर वेगण टिपलेर अँट सीएचपी-१ ईएम, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ७.१४ लाख १०६४०/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०४१४ | सप्लाय ऑफ स्टेबल ब्लीचिंग पाऊडर, ग्रेड-२, आयएस-१०६५/१९८९ फॉर डब्ल्यूटीपी यू-८, स्टेज-२, टीपीएस, परळी वै. | १३.१४ लाख १६६४०/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०४४४ | वर्क ऑफ कंप्लीट ओवरहौलिंग ऑफ हेवि -ड्यूटि पंप्स अँट टीएम-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ७.५५ लाख ११०५६/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०४७७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ एचटी ऑक्झिलरी व्हायब्रेशन मॉनिट्रिंग सिस्टिम स्पेयर्स इंस्टॉलड अँट आय अँड सी-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.५५ लाख १३०५७/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३००००६०६०५ | टू ईयर एएमसी फॉर मॅन पॉवर असिस्टंस फॉर व्हेरियस डे टू डे जनरल शिफ्ट वर्क अँट आय अँड सी-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २०.४९ लाख २३९९४/- | ०९.०८.२०२५ ते ३०.०८.२०२५ | ३१.०८.२०२५ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ : ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे. सर्व निविदा करिता निविदा किंमत रु.११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती : मुख्य अभियंता, टीपीएस परळी -वैजनाथ, मेल आय डी-parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या : https://eprocurement.mahagenco.in SRM help desk Email ID - etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक - ८४११९७१५२५

मुख्य अभियंता





■ सध्या निवडणूक तोंडावर आली असल्याने सत्ताधारी पक्ष जो जे वांछिल तो ते लाहो या भूमिकेत आहे. नांदणी इथल्या माधुरी हत्तीणीचे हाल होत आहेत हे बघून सर्वोच्च न्यायालयाने तिला वनतारा मध्ये पाठवा सांगितले परंतु स्थानिकांनी या विरोधात आंदोलन केले हे बघून सरकार तिला परत आणायला निघाले. मुंबईत कबुतरखान्यामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार होऊ लागले आहेत म्हणून विधानसभेत चर्चा झाली. न्यायालयाने सांगितले म्हणून कबुतरखाना हटवला गेला. जैन मंडळी , प्राणीप्रेमी संतापले , रस्त्यावर आले. सरकारने तत्काळ घुमजाव केले आणि कबुतरखाना बंद करण्याचा निर्णय मागे घेतला. समस्त नागरिकांच्या साठी पुढील काही महीने ही सुसंधी आहे. तुम्ही कोणतीही मागणी घेऊन रस्त्यावर या; सरकार तुमचा शब्द झेलायला तयार आहे. फक्त रस्त्यावर खड्डे आहेत, ट्रॅफिक जाम मुळे परेशानी होते आहे. अतिक्रमणांनी हैराण होण्याची वेळ आली आहे, ध्वनी प्रदूषणामुळे त्रास होतो आहे अश्या खऱ्या समस्या घेऊन जाऊ नका.. त्या सोडवल्या जाणार नाहीत.

■ डोनाल्ड ट्रंप हे आता जगातील सर्वोत्कृष्ट विनोदवीर सिद्ध होण्याच्या मार्गाला लागले आहेत. त्यांनी भारतावर आधी २५ टक्के नंतर ५० टक्के टेरिफची घोषणा केली. फार्मा उत्पादनांवर तब्बल २५० % टेरिफ लावतो म्हणून धमकावले. यावर भारताच्या परराष्ट्र खात्याने जे सविस्तर आणि मुद्देसूद उत्तर दिले ते म्हणजे अमेरिकेला दिलेली चपराक होती. भारताने आकडेवारी सह यूरोपियन युनियन आणि अमेरिकेचा दुटप्पीपणा उघड केला. भारताला रशियाशी व्यवहार करू नका हा सल्ला देणारी यूरोपियन युनियन आणि अमेरिका भारतापेक्षा जास्त प्रमाणात रशियाशी व्यापार करत असल्याचे भारताने सिद्ध केले. पत्रकारांनी डोनाल्ड ट्रम्पला विचारलं ''अमेरिका रशियाकडून खत, युरेनियम आणि रसायनं आयात करतं का?'' या संदर्भात ट्रंप यांनी उत्तर दिले ''मला माहिती घ्यावी लागेल , मला याची कल्पना नाही.'' तुम्हाला तुमचा देश रशियाशी किती मूल्याचा व्यापार करतो हे माहिती नसेल तर तुम्ही भारताला कोणत्या तोंडांने शहाणपणा शिकवत आहात ??? हा सगळा प्रकार हास्यास्पद आहे. भारतातील एखाद्या महापालिकेचा नगरसेवक सुद्धा पूर्ण माहिती न घेता पत्रकार परिषदेला जात नाही आणि डोनाल्ड ट्रंप पत्रकार परिषदेला सामोरे जाण्यापूर्वी काहीही तयारी करत नाहीत हे खरच खूप गंभीर आहे.

■ देवेंद्रजी फडणवीस यांना लोक ''मॅनेजमेंट मास्तर'' म्हणतात, पण लाडकी बहीण योजनेच्या रूपाने त्यांनी महिलांच्या बाबतीत जे काही केले आहे त्याला माणुसकीचं राजकारण म्हणतात. या संदर्भातील एक हृदय किस्सा.विदर्भातलं एका छोट्याशा गावातलं आभाळभर दारिद्र्यग्रस्त घर. शांता नावाची एक महिला, वय सत्तावीस नवरा मोलमजुरी करणारा, दोन मुलं, आणि घर म्हणजे चार विटा आणि पत्र्याचं छप्पर. सकाळचं पाणी भरायचं, मुलांची भांडणं, नवऱ्याच्या नोकरीची अनिश्चितता, आणि दुपारनंतर गावातल्या शेतावर रोजंदारी. कुठेही स्वतःसाठी क्षण नव्हता. आयुष्य म्हणजे सावकारी कर्जाच हफ्ता जे उगाच वाढतच चाललेलं. पण गावातल्या इतर महिलांना प्रत्यक्ष पैसे येताना पाहिल्यावर ती आपल्या नावाने अर्ज करून आली. आधार, रेशनकार्ड, बँक पासबुक घेऊन अंगणवाडीच्या कार्यालयात ती उभी होती, आणि एका महिन्याने तिच्या खात्यात १५०० रुपये आले आणि दरमहा मिळणाऱ्या या मदतीने तिला नवाच आत्मविश्वास आणि जगण्याची उभारी मिळाली. ही योजना फक्त पैसे देण्यापुरती मर्यादित नाही, ती बाईला 'लक्षात घेतलं जातंय' हे जाणवून देणारी आहे.

■ इतकी वर्षे कोंग्रेसी स्वतःला अनुकूल असणारे न्यायमूर्ती नेमत असत आणि त्यावेळी त्यांना यात गैर वाटत नसे. तेच भाजपाने केले की आता त्यांना त्रास होतो आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना न्यायपालिकेचा निष्पक्षपणा धोक्यात आला आहे असे वाटू लागले आहे.कारण काय तर आता न्यायाधीशपदावर सत्ताधारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती होत आहे.खरे तर त्यांनी अशा एकाच नेमणुकीचे उदाहरण दिले आहे आणि त्यावरून असा पक्षपात मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचे दाखवण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे.सपकाळ यांना शंका वाटत आहे की अशी नेमणूक झालेली व्यक्ती निष्पक्षपणे न्याय देईल का?सपकाळ पुढे म्हणतात की अशी नेमणूक होणे लोकशाहीला अत्यंत घातक आहे. सपकाळ यांनी हे मत व्यक्त करण्याचे कारण असे की ॲड.आरती अरुण साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.ॲड.साठे यांनी यापूर्वी भाजप महाराष्ट्र प्रदेशच्या प्रवक्ता पदावर काम केले आहे आणि २०२३ साली भाजपने प्रदेश प्रवक्तेपदावरील व्यक्तींच्या नावाची जी यादी जाहीर केली होती त्या यादीत ॲड.आरती अरुण साठे यांचे नाव आहे.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### अनुज्ञापन खाते (अतिक्रमण निर्मूलन) विभाग

**सआ/आर-मध्य/ओड़ी/ ५४/अ.नि. दि.०७.०८.२०२५**

### जाहिर सुचना

आर-मध्य विभागातील अनुज्ञापन खात्यात अतिक्रमण निर्मूलन विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर अतिक्रमण निर्मूलन कारवाईकरिता तसेच अनधिकृत जाहिरात फलक (बॅनर्स, बोर्ड्स) यांच्यावर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. सदर कामासाठी इच्छुक स्थानिक (आर/मध्य प्रभागाच्या कार्यक्षेत्रात) अनुभवी अशासकीय/सेवा सहकारी/ बेरोजगार संस्थेची निवडकरण्यासाठी इच्छापत्र मागविण्यात येत आहेत व सदरची जाहीर सुचना म.न.पा. संकेतस्थळावर https://portal.mcgm.gov.in या वर प्रदर्शित करण्यात आली आहे.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक (अति. निर्मू) बृहन्मुंबई महानगरपालिका आर/मध्य विभाग कार्यालय, दुसरा मजला, रुम नं ३७, चंदावरकर मार्ग, बोरीवली (प), मुंबई -४०० ०९२ येथे चलन काढून दि. ०८.०८.२०२५ ते १२.०८.२०२५ या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत कामाच्या दिवशी (दुसरा व चौथा शनिवार व सुट्टीचा दिवस सोडुन) लेखी अर्जकरून रू ३३००/- अधिक १८% जिएसटी हि रक्कम भरूनविकत मिळेल व रुपये १५,५००/-इ.सा.रा. (EMD) रक्कम रोख किंवा डी.डी. याद्वारे भरून आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. १२.०८.२०२५ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत अनुज्ञापन खात्यात अतिक्रमण निर्मूलन विभाग आर/मध्य विभाग कार्यालय, दुसरा मजला, रुम नं ३७, चंदावरकर मार्ग, बोरीवली (प), मुंबई -४०० ०९२ येथे सिलबंद पेटीमध्ये टाकावे. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सही/-
सहाय्यक आयुक्त आर-मध्य विभाग

**पीआरओ/१२३७/एडीवी/२०२५-२६**

झाडांना नका करु नष्ट, श्वास घेताना होईल कष्ट



## TOMORROW TECHNOLOGIES GLOBAL INNOVATIONS LTD.

(FORMERLY KNOWN AS CNI RESEARCH LTD.)
Regd. Office: A-120, Gokul Arcade, Sahar Road, Vile Parle (East), Mumbai - 400 057.
CIN No. : L45202MH1982PLC041643 Email id:chamatcar@chamatcar.com Contact: 022-49737861

**Statement of Standalone Unaudited Results for the Quarter ended 30/06/2025**

(Rs. In Lacs/amount)

| Particulars | CONSOLIDATED | | | STANDALONE | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 months ended 30/06/2025 (UNAUDITED) | Preceding 3 months ended 31/03/2025 (AUDITED) | Year ended 31/03/2025 (AUDITED) | 3 months ended 30/06/2025 (UNAUDITED) | Preceding 3 months ended 31/03/2025 (AUDITED) | Corresponding 3 months ended in the previous year 30/06/2024 (UNAUDITED) | Year ended 31/03/2025 (AUDITED) |
| 1 Total Income from Operations | 27.54 | 3.95 | 444.19 | 27.54 | 3.95 | 418.55 | 444.19 |
| 2 Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#) | 8.54 | (104.40) | (488.43) | 2.69 | (9.65) | 21.78 | (393.68) |
| 3 Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items and/or Extraordinary items#) | 8.54 | (104.40) | (488.43) | 2.69 | (9.65) | 21.78 | (393.68) |
| 4 Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 8.54 | (104.40) | (488.43) | 2.69 | (9.65) | 21.78 | (393.68) |
| 5 Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 8.54 | 423.4 | 39.37 | 2.69 | 518.15 | 170.59 | 134.13 |
| 6 Equity Share Capital | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 |
| 7 Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | 382.73 | 382.73 | 382.73 | 477.48 | 477.48 | 343.36 | 477.48 |
| 8 Earnings Per Share (of Re.1/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | | | |
| 1) Basic: | 0.007 | (0.09) | (0.43) | 0.002 | (0.01) | 0.02 | (0.34) |
| 2) Diluted: | 0.007 | (0.09) | (0.43) | 0.002 | (0.01) | 0.02 | (0.34) |

**Notes:**

a) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings).

b) The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.

c) # - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

For TOMORROW TECHNOLOGIES GLOBAL INNOVATIONS LTD.
(Formerly known as Cni Research Ltd.)
MR. KISHOR OSTWAL
MANAGING DIRECTOR
(DIN:00460257)

Date :- 08-08-2025
Place :- MUMBAI



## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी, जि. ठाणे

BHWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION BHIWANDI (Dist. Thane) MAHARASHTRA OLD S.T.STAND, KAP-ALI, BHIWANDI- 421302, DIST. THANE.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे महाराष्ट्र, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, भिवंडी- ४२१३०२, जि. ठाणे.

TEL : 02522-55314/55315, FAX : 02522-52074

### ई-निविदा सुचना क्र. १

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| ई-निविदा क्र/ई-निविदा फ़ी/कामाचे स्वरुप | ई-निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख |
|---|---|
| जनसंपर्क विभागाकाडील ई-निविदा क्र.१ /१९००/- सन २०२५/२०२६ या वर्षाकरीता महानगरपालिकेकरीता छपाई साहित्य पुरवठा करणेकामी खालील कामाचे वार्षीक दर मागवीण्यात येत आहे.<br>१) ई-निविदा क्र.१ छपाई साहित्य पुरवठा करणे बाबत | दि. १४/०८/२०२५ |

सदर ई-निविदा मनपा संकेतस्थळ mahatenders.gov.in वर दि.०८/०८/२०२५ पासून ते दि १४ /०८/२०२५ पर्यंत उपलब्ध आहेत. आपल्या ई-निविदा वर नमूद केलेल्या तारखेच्या दु.०३.०० वा. पर्यंत पाठविण्यात याव्यात.

सही/-
उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

जा.क्र./ज.सं.वि./८३१
दि.७/०८/२०२५